# अभिरुची

**मराठी मंडळ सॅक्रामेंटोचे त्रैमासिक मुखपत्र.**

- प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व मंडळ सहमत असतेच असे नाही.
- लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलांचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक व मंडळाकडे राहतील

# २०१९-२० अंक # २


- संपादकीय — हिमानी कुलकर्णी
- अध्यक्षीय — अजित नातू
- मराठी शाळा वृत्तांत — विक्रम बोबडे, पल्लवी सावंत
- जेवणघरातली खिडकी — स्मिता कुलकर्णी
- कविता: बहावा — अमिता खरे
- स्कॉटलंड- निसर्ग, राणी आणि जीवनपाणी .. — प्रीती देशपांडे
- चित्रकथी: फायरफॉल — सुलभा हारदे
- पाककृती: सोयाबीन कोकोनट करी — मनिषा होतपेटी
- उर्वरित कार्यक्रम कॅलेंडर — कार्यकारिणी

# संपादकीय

नमस्कार मंडळी,

"अभिरुची" चा या वर्षातला दुसरा अंक तुमच्या हातात देताना खूप आनंद होतो आहे. मागच्या  अंकाप्रमाणेच या अंकामध्येदेखील तुम्हाला खूप छान साहीत्य वाचायला मिळेल. या अंकासाठी ज्या मित्र मैत्रिणींनी साहीत्य पाठवले, त्यांचे मी मनापासून आभार मानते. तुम्हा सर्वांच्या प्रतिसादामुळे आणि मराठी भाषेवरील प्रेमामुळेच हे त्रैमासिक चालवणे शक्य आहे.

या अंकात सर्वप्रथम वाचा आपल्या मंडळाचे अध्यक्ष श्री. अजित नातू यांचे मनोगत. आपल्या कार्यकारिणीने या वर्षीचा कार्यभार स्वीकारल्यापासून अत्यंत मेहनतीने काही कार्यक्रम आयोजित केले. उरलेल्या वर्षात सुद्धा अशा अनेक कार्यक्रमांची रेलचेल असेल. हे सर्व सांभाळताना येणारे अनुभव, आव्हाने याबद्दलचे त्यांचे विचार त्यांनी या लेखात व्यक्त केले आहेत.

मराठी माणूस जरी महाराष्ट्रापासून दूर परक्या देशात स्थायिक झाला तरी मराठी संस्कृती पासून दूर जाऊ शकत नाही. हे मराठी संस्कृतीचे बाळकडू पुढच्या पिढीला मिळावेत म्हणून आपल्यातील काही स्वयंसेवक अतिशय सेवाभावी वृत्तीने "मराठी शाळे" चे काम करत आहेत. या अंकात विक्रम बोबडे आणि पल्लवी सावंत सांगत आहेत मराठी शाळेचा वृत्तांत. वार्षिक स्नेहसंमेलनातील काही क्षणचित्रेही त्यांनी आपल्याशी शेअर केली आहेत.

"Human is a social animal" असं म्हणतात. माणूस म्हणून जगताना आपण अनेक व्यक्तींशी कनेक्ट होत असतो. पण आपल्या Ecosystem मध्ये माणसाव्यतिरिक्त इतर अनेक असे घटक असतात जे आपलं जीवन अधिक सुंदर बनवतात. "जेवणघरातली खिडकी" या लेखात स्मिता कुलकर्णी यांनी त्यांच्या पक्षीमित्रांशी असलेल्या सुंदर नात्याबद्दल लिहिले आहे. या खिडकीतून डोकावल्यावर आपल्याला या पक्षीमित्रांबद्दल माहिती तर मिळेलच पण या नात्याची घट्ट वीण देखील अनुभवता येईल.

कविमनाच्या व्यक्तीला कधी आणि कुठून प्रेरणा मिळेल ते काही सांगता येत नाही. अशीच आपली एक कविहृदयी मैत्रीण अमिता खरे Cancun, मेक्सिको येथे फिरायला गेलेली असताना तेथे तिला  फुललेला बहावा दिसला आणि त्यातून स्फुरलेले काव्य तिने आपल्याशी या अंकात शेअर केले आहे. त्या फुललेल्या बहाव्यासारखीच सुंदर आणि फ्रेश अशी ही कविता तुम्हाला नक्कीच आवडेल.

प्रवास करणे हा स्वतःच्या संकुचित विश्वाबाहेर जाऊन नवीन अनुभव घेण्याचा आणि माणूस म्हणून समृद्ध होण्यासाठीचा एक उत्तम मार्ग आहे. मला स्वतःला प्रवास करायला तर आवडतंच पण इतरांनी लिहिलेलं प्रवास वर्णन वाचायलाही खूप आवडतं. इतरांच्या अनुभवातूनही आपण खूप काही शिकतो. "स्कॉटलंड- निसर्ग, राणी आणि जीवनपाणी" या प्रवास वर्णनात प्रीती देशपांडे यांनी त्यांचे स्कॉटलंड देशातील अनुभव आपल्याशी शेअर केले आहेत. अतिशय माहितीपूर्ण आणि रंजक असा हा लेख तुम्हाला बसल्या जागी स्कॉटलँडची सफर घडवून आणेल.

"चित्रकथी" या सदरात सुलभा हारदे हिने Yosemite National Park येथील "फायरफॉल" चे तिने काढलेले अप्रतिम फोटोग्राफ्स आपल्याशी शेअर केले आहेत. त्याचबरोबर ह्या छायाचित्रांमागील छोटीशी गोष्ट देखील तिने सांगितली आहे. हे वाचल्यावर आपल्याला कळेल की एखाद्या उत्तम छायाचित्रामागे फक्त कॅमेरा नसून त्या छायाचित्रकाराचे तांत्रिक ज्ञान आणि कलात्मक दृष्टीदेखील असते. सुलभाच्या photography skills चे तर कौतुक आहेच पण त्याहून जास्त कौतुक तिच्या फोटोग्राफी बद्दलच्या आत्मीयतेचे आहे.


"पाककृती" या सदरात मनिषा होतपेटी यांनी "सोयाबीन कोकोनट करी" ही पाककृती आपल्याशी शेअर केली आहे. या भाजीचे फोटो पाहूनच तुमच्या तोंडाला पाणी सुटेल आणि ही स्वादिष्ट रेसिपी तुम्ही नक्की करून पहाल याची मला खात्री आहे.

अंकाच्या शेवटी आहे उरलेल्या वर्षातील कार्यक्रमांचे वेळापत्रक. या कार्यक्रमांना तुम्ही मोठ्या संख्येने उपस्थित रहावे आणि आपल्या कार्यकारिणीला प्रोत्साहन द्यावे ही विनंती.

“संपादकीय” संपवण्याआधी अजून एक गोष्ट नमूद करावीशी वाटते. अभिरुचीचा Q3 मधील म्हणजेच ऑक्टोबर मधील अंक असेल "दिवाळी अंक". या अंकासाठीचा विषय आहे "दिग्गजांची जन्मशताब्दी". चालू वर्ष हे साहित्य आणि संगीतातील तीन दिग्गजांचे म्हणजेच ग.दि . माडगूळकर , पु .लं. आणि सुधीर फडके अर्थात आपले लाडके बाबूजी यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. या तीन महारथींच्या कार्याचा आवाका एवढा होता कि त्यांचे साहित्य आणि संगीत हे प्रत्येक मराठी माणसाच्या हृदयात पुढची कित्येक वर्षे घर करून राहील. तुमच्याही आयुष्यात या व्यक्तींनी नक्कीच मोलाची भर घातली असेल, मग ते दर्जेदार साहित्य असो किंवा सुमधुर संगीत. तर आपल्या दिवाळी अंकासाठी लिहा या दिग्गजांच्या कार्याबद्दल, त्यांच्या कलाकृतींनी तुमच्या आयुष्यात आणलेल्या आनंदाबद्दल किंवा त्यांच्या तुम्हाला भावलेल्या एखाद्या कलाकृतीबद्दल. खरं सांगायचं तर या विषयावर लिहावं तितकं कमीच आहे. आपण अभिरुचीच्या दिवाळी अंकाच्या निमित्ताने या legends ना एक छोटीशी आदरांजली देण्याचा प्रयत्न करू. या विषयांव्यतिरिक्त इतर विषयांवरील दर्जेदार साहित्यदेखील स्वीकारले जाईल. दिवाळी अंकासाठी साहित्य पाठविण्याची शेवटची तारीख आहे १५ ऑक्टोबर. साहित्य पाठविण्यासाठीचा email address contact2himani@gmail.com .

चला तर मग , लागा तयारीला .. आपण पुन्हा भेटूच पुढील अंकाच्या म्हणजेच दिवाळी अंकाच्या निमित्ताने !!

आपली स्नेहांकित,



-हिमानी कुलकर्णी

(संपादक, अभिरुची - MMSAC )

PNG
JEWELERS

sanskrit
new age indian

# अध्यक्षीय

**नमस्कार मंडळी,**

२०१९-२० च्या मंडळाच्या नवीन कार्यकारिणीने फेब्रुवारी १ ला काम सुरु केले आणि बघता बघता अर्धे वर्ष उलटले. दोन विशेष कार्यक्रम सादर केले गेले – १. मराठी नाटक 'एका लग्नाची पुढची गोष्ट २. होळी.

प्रशांत दामले यांची मुख्य भूमिका म्हंटल्यावर नाटक बहारदार होणार हे तर साहजिकच आणि तसाच हा प्रयोग आपल्या मंडळात झाला. भारतातून त्यांची सगळी नटमंडळी गुरुवारी आपल्या इथे आली आणि मग जे काही तीन दिवस गडबडीत गेले कि काही विचारू नका. अनेक स्वयंसेवक आधीचे दोन-तीन आठवडे खूप काम करून रंगभूमीची व नेपथ्याची तयारी करत होतेच. त्यात शुक्रवारी आणखीनच वेग पकडला व संध्याकाळच्या प्रयोग सुरु होण्याच्या वेळेबरोबर जणू स्पर्धा करत स्वयंसेवकानी ते पूर्ण केले हे कौतुकास्पद होते. त्यात नटांनी येऊन मोलाच्या सूचना केल्या. रंगभूमी खूप छानच दिसत होती. बटाटेवडा आणि चहा ह्याशिवाय मराठी नाटक ते काय! मग त्याचे आयोजन साहजिकच केले होते व लोकांना आवडले. नाटक अगदी वेळेवर सुरु केले गेले. नाटक तर काय विचारूच नका! काय धमाल आली. प्रशांत दामले यांनी कमाल केली. अख्ख्या प्रेक्षकवर्गाला दोन-अडीच तास सतत हसवत ठेवले. प्रेक्षकांनी शिट्या, हास्य व टाळ्या वाजवून मस्त दाद दिली ती मनापासून! एक व्यावसायिक नाटक आपल्यासारख्या छोट्या मंडळात आणणे सोपे नाही. तरी मस्त प्रयोग झाला त्यातच समाधान व खूप मंडळींनी केलेल्या कामाची पावतीच. खरंच कार्यकारिणीतील सभासदांचे व सर्व स्वयंसेवकांचे मनापासून आभार.

होळी हा पण सण छान झाला असा अभिप्राय मिळाला. अगदी भारतात आपण रंग खेळून, धमाल करत नाचगाणी याबरोबर जसा करायचो तस्साच आपण इथे अनुभवला. पुन्हा त्यात खेळ जोडीला असल्यामुळे खूप धमाल आली. आणि खाद्यपदार्थ काय विचारू नका. थंडाई, पावभाजी, कबाब, सामोसा, चहा म्हणजे काय खाऊ अन काय नको असे पोटभर पदार्थ होते. आणि पुरणपोळी व त्यावर तूप म्हणजे तर मेजवानीच.

आता वेध लागले आहेत ते पुढील कार्यक्रमांचे. पहिली मंडळाची सहल ३ ऑगस्टला आहे. पोहोण्याच्या तलावावर पहिल्यांदाच मंडळात ह्याचे आयोजन केले आहे. म्हणजे अर्धवर्तुळ ट्यूब मधून मुले जाऊन थेट पाण्यात उडी घ्यायची सोय आहे. त्यामुळे मुलांना तर धमाल येणार हे नक्कीच. सहलीसाठी तुम्ही सर्व मंडळींनी हजेरी नक्की लावा व वेबसाईटवर पैसे भरून साईन करा. नंतर सप्टेंबरमध्ये होणार आहे गणेशोत्सव. ढोल ताशाच्या गजरात आपण बाप्पाला मोरया करायचा आहे व तुम्हा मंडळींना स्वतःचे खाद्यपदार्थ विकण्याचे टेबल गेल्यावर्षीप्रमाणे आयोजित करता येणार आहे. ऑक्टोबरमध्ये खास पब्लिक डिमांड म्हणून 'क्रूझ' कार्यक्रम कोजागिरीनिमित्त आयोजित केला आहे. इंडियन असोसिएशन सॅक्रामेंटोच्या "इंडिया डे" ह्या ११ ऑगस्टच्या कार्यक्रमाला नक्की उपस्थित राहावं. आपल्या मंडळातर्फे दोन नाचाचे प्रोग्राम होणार आहेत.

मंडळाचे आगामी कार्यक्रम कॅलेंडर फेसबुक वर उपलब्ध आहे. ते वाचून लग्गेच तुमच्या कॅलेंडरवर तारखा नोंदवून ठेवा. प्रत्येक कार्यक्रमासाठी कृपया वेळेत RSVP करावे.आपण आपलं उत्तर (हो/नाही) जे काही असेल ते जर वेळेत दिलंत तर त्यामुळे आम्हाला कार्यक्रमाच्या नियोजनात बरीच मदत होईल. जाता जाता हे पण नमूद करावेसे वाटते कि कार्यकारीणीवर एक उपसचिव हि जागा अजूनही भरली नाहीये. कारण कोणी पुढे येत नाहीये. कार्यकारीणीतल्या उरलेल्या चार जणांवर जास्त काम होत आहे व ताण पडत आहे. तेंव्हा आपल्याला पुढील कार्यक्रमांसाठी मदत किंवा लीड घेण्याची विनंती करतो.

प्रत्येक कार्यक्रमासाठी झटणारे स्वयंसेवक, मंडळाला आर्थिक मदत करणारी मंडळी, सांस्कृतिक कार्यक्रमात हिरिरीने भाग घेणारे स्थानिक कलाकार, आपले प्रायोजक आणि आपण सर्व सुद्धा आमच्या बरोबर

आहातच. कुठलाही कार्यक्रम ह्या सर्व लोकांशिवाय यशस्वी होवूच शकत नाही. त्याबद्दल खूप आभार. तसेच कार्यकारिणीकडून काही चुका झाल्या असतील तर क्षमा करावी ही विंनंती.

आपले जे प्रायोजक आहेत त्यांच्या प्रोडक्ट्स किंवा सर्विसेस बद्दल माहिती जाणून घ्या आणि शक्य असेल तेंव्हा त्यांचे ग्राहक बना. ही मंडळी आपल्या मंडळाला आर्थिक पाठींबा देत आहेत त्यामुळे आपण सुद्धा त्यांचा विचार करावा.

मंडळी, 'अभिरुची' चा हा ह्या वर्षीचा दुसरा अंक. कृपया आपण तो संपूर्ण वाचवा ही अपेक्षा. आपल्या काही सूचना असतील तर त्या नक्कीच आमच्यापर्यंत पोहोचवा. अभिरुचीच्या माध्यमातून तुमची मराठी लिहिण्याची आणि वाचण्याची सवय खंडित होऊ नये तसेच आपल्या मंडळातील इतर घडामोडींची माहिती मिळावी हाच उद्देश. गेल्या अंकाप्रमाणे ह्या अंकासाठीसुद्धा हिमानीने भरपूर मेहेनत घेतली आहे. तिचे खूप धन्यवाद व मराठी भाषेच्या तळमळीबद्दल कौतुक करतो. तिला भेटून व मिडियावरून अभिप्राय नक्की द्यावा.

धन्यवाद,

आपला नम्र



**अजित नातू**
**अध्यक्ष, मराठी मंडळ सॅक्रामेंटो**

RUCHI
INDIAN CUISINE

*******************************************************************************************



# मराठी शाळा वृत्तांत

नमस्कार मंडळी,

आपल्या मंडळाच्या मराठी शाळेच्या नवीन शैक्षणिक वर्षाला लवकरच म्हणजे ऑगस्ट महिन्यात सुरुवात होणार आहे. काही आठवड्यांपूर्वी आम्ही नवीन सत्रासाठी नोंदणी करण्याबद्दल सर्वांना ई-मेल पाठवली होती. ज्या पालकांनी आपल्या मुलांची नोंदणी वेळेत पूर्ण केली त्यांना मनापासून धन्यवाद! कृपया आपल्या परिचित सॅक्रामेंटो मधील मराठी कुटुंबीयांपर्यंत मराठी शाळेची माहिती नक्की पोहोचवा म्हणजे जास्तीत जास्त मुलांना मराठी शिकण्याची संधी प्राप्त होईल.

वर्षागणिक मराठी शाळेतील मुलांच्या संख्येत वाढ होत आहे हि निश्चितच आनंदाची बाब आहे पण त्याहूनही आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांची होणारी मराठी भाषेतील प्रगती. एकीकडे जिथे महाराष्ट्रात मराठी शाळा ओस पडू लागल्या आहेत तिथे बारा हजार मैल दूर असणाऱ्या अमेरिकेत पालक मुलांना मराठी शाळेत पाठवायला आग्रही आहेत आणि ती मुलंही मोठ्या आवडीने मराठी शिकताहेत हि निश्चितच कौतुकाची गोष्ट आहे.

मंडळी, आपल्या मराठी शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम दि. २४ मार्च २०१९ रोजी एम्पायर ओक एलिमेंटरी फॉल्सम येथे पार पडला. मराठी शाळेच्या तीनही शाखेतील विद्यार्थांनी मराठी भाषेतील विविध कार्यक्रम सादर केले. विद्यार्थांनी मराठी श्लोक, कविता, गाणी आणि नाटक सादर करून उपस्थित प्रेक्षकांची दाद मिळवली. हे विविधरंगी कार्यक्रम यशस्वी करून घेण्यासाठी ज्या पालकांनी आणि शिक्षकांनी मेहेनत घेतली त्यांचे मनापासून आभार.






मराठी शाळेची वार्षिक सहल दि. ४ मे २०१९ रोजी आयोजित करण्यात आली होती. यंदा सहलीचे ठिकाण ऑबर्न येथील ब्लॅक होल ऑफ कलकत्ता फॉल्स हे होते. अमेरिकन रिव्हरच्या बाजूबाजूने जाणारी पायरपेट शेवटी एका अतिशय सुंदर धबधब्या जवळ संपते. सहलकऱ्यानी धबधब्या शेजारी थांबून तुषारांचा आनंद घेतला तसेच परत येतांना अमेरिकन रिव्हरच्या पात्राजवळ बसून भोजनाचा आस्वाद घेतला. यंदाच्या सहलीचे ठिकाण सुचवणाऱ्या श्री. विनायक पाटील ह्यांचे मनापासून आभार. दुर्दैवाने सहलीला हवा तेवढा प्रतिसाद मिळाला नाही. असो, पुढील वर्षी जास्तीत जास्त पालक आणि विद्यार्थी सहलीसाठी येतील अशी आशा करूया.





नुकत्याच संपलेल्या २०१८-१९ ह्या शैक्षणिक वर्षात आपल्या मराठी शाळेतून २२ विद्यार्थांनी बृहन महाराष्ट्र मंडळा तर्फे घेण्यात येणारी वार्षिक परीक्षा दिली. हा लेख प्रकाशित होईपर्यंत कदाचित परीक्षेचे निकाल जाहीर झाले असतील. यशस्वी विद्यार्थांना मराठी मंडळाच्या गणेशोत्सवाच्या कार्यक्रमात प्रशस्तिपत्रक आणि मेडल देण्यात येईल. आपले इतर व्याप सांभाळून ह्या विद्यार्थांना वर्षभर मराठी शिकवणाऱ्या स्वयंसेवी शिक्षकांचे मनापासून आभार. नवीन सत्रासाठी कुणाला मराठी शाळेत शिक्षक म्हणून काम करायचे असल्यास कृपया आमच्याशी लवकरात लवकर संपर्क साधा.

(फोटो : मराठी शाळेच्या वार्षिक परीक्षा सुरु असतांनाचा एक क्षण)



यंदाच्या उन्हाळयाच्या सुट्टीत बीएमएम तर्फे मराठी शाळेतील शिक्षकांसाठी प्रथमच एका स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहेत. आपल्या शाळेतील सर्व शिक्षक ह्यात सहभागी होतील अशी आशा करूया.

जाता-जाता महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस ह्यांनी नुकताच घेतलेला एक स्वागतार्ह निर्णय येथे नमूद करावासा वाटतो. महाराष्ट्र सरकार लवकरच एक कठोर कायदा करणार असून त्याद्वारे महाराष्ट्रातील सर्व बोर्डांच्या शाळांमध्ये आता मराठी भाषा शिकवणे बंधनकारक असणार आहे. ह्या निर्णयामुळे मराठी भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होईल अशी आशा करण्यास हरकत नाही.

धन्यवाद,

**विक्रम बोबडे**

**पल्लवी सावंत**

(mmsac.shala@gmail.com)

Reliance™
SuperMart

****************************************************************************************************



# जेवणघरातली खिडकी

आमच्या घरातल्या जेवणघरातली खिडकी हा मला मिळालेला एक जबरदस्त आणि अनमोल खजिना आहे. त्या खजिन्यात असलेली सजीवता मला सोन्यामाणकांपेक्षाही लक्ष पटीने मौल्यवान वाटते. या खिडकीने मला इतकं काही दिलं आहे, इतकं शिकवलं आहे, जे चार शब्दात किंवा अनेक शब्दांच्या भांडारात देखील बसवणे कठीण आहे. पण मला वाटणारी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी केलेला हा एक निर्मळ प्रयत्न...

जेवणघरातली ही प्रशस्त खिडकी टेबलाच्या बरोबर समोर आहे. दिवसातल्या कुठल्याही वेळेला टेबलापाशी बसलं की ती मला तिला लागून असलेल्या बाहेरच्या गच्चीवरचा नजारा दाखवत रिझवत रहाते. नित्यनव्या गोष्टींची खाण ती अक्षरश: माझ्यापुढे उपडी करते. कामधाम सोडून आणि कित्येकदा काम करता करता थांबून मी त्या खिडकीने रंगवलेल्या सोहळ्याची मजा लूटत रहाते. ह्या खिडकीने मला खूप मित्रमंडळी मिळवून दिली आहेत. माझा दिवस चालू झाला की ती नेमाने मला भेटायला येतात. आमच्यातला संवाद काहीसा मुका आणि डोळ्यातून होणारा असतो पण त्यांच्या उपस्थितीने माझ्या ओठावर येणारं हसू आणि मनाला होणारा आनंद मी लपवू शकत नाही. दिवसाची सुरुवात सुंदर करणाऱ्या त्या मित्रांचे मी प्रसन्न मनाने स्वागत करते.



नियमित येणाऱ्या दोस्तांमध्ये असतात फिंच पक्षांची जोडपी. बर्ड फिडर मधल्या दाण्यांचा नाश्ता करण्यासाठी येणारी ही जोडपी त्यांच्या मधूर चिवचिवाटाने मला खुणावतात. लालसर-गुलाबी रंगाचे डोके व पोट असलेले नर आणि तपकिरी-पांढऱ्या अशा रंग माध्यमाची मादी. त्यांच्या चोची मात्र चांगल्या मोठ्या असतात. वेळ देऊन, न गडबड करता ते सूर्यफुलाच्या बिया चोची मारून खात राहतात.



मग हळूच येतात मंजूळ शीळ घालून साद देणारे ओक टिटमाउस पक्षी. हे राखाडी रंगाचे चिमुकले पक्षी त्यांच्या डोक्यावरच्या छोट्याशा तुऱ्यामुळे आणि करड्या रंगाच्या गोलसर चोचींमुळे खूप डौलदार दिसतात. ओक वृक्षांच्या गर्द छायेत राहणारे हे सुंदर पक्षी सतत एकमेकांना साद घालत असतात.



या सर्वांची गडबड संपली की येतात तपकिरी रंगाचे कॅलिफोर्निया टोही पक्षी. लांब शेपटीचे हे सुबक पक्षी बऱ्याचदा शिवाशिवी खेळल्यासारखे एकमेकांभोवती पळत असतात. त्यांच्या शेपटीच्या खालच्या बाजूची पिसे ठळक तांबूस रंगाची असतात. अतिशय गोड आवाजात ते शिट्या मारत असतात. बशीतले दाणे टिपताना स्वतःच्या पायांनी दाणे बाहेर उडवत राहण्याचा मजेदार खेळ ते खेळत रहातात. हे टोही पक्षी आपल्या पिल्लांनाही कधी बरोबर घेऊन येतात आणि घास भरवत रहातात.

क्वचित कधी भेट देतो काळ्या डोक्याचा ग्रॉसबिक पक्षी. त्याच्या भेटीची वेळ सकाळी अगदी लवकर असते. फिंचच्या जमातीतलाच हा एक पक्षी त्याच्या काळ्या डोक्यामुळे आणि नारिंगी-पिवळ्या पोटामुळे खूपच वैशिष्ट्यपूर्ण दिसतो. त्याचे पंख काळे असतात आणि त्यावर मधेमधे शुभ्र पांढरे पट्टे असतात. अतिशय आवडीने सूर्यफुलाच्या बिया खाणारा हा पक्षी त्याच्या मोठ्या चोचीमुळे आणि रंगीबेरंगी पिसांमुळे खूप आकर्षक दिसतो.





सकाळच्या या भेट देणाऱ्या दोस्तांना स्वतःच्या कर्कश आवाजाने पळवून लावणाऱ्या निळसर-राखाडी रंगाच्या कॅलिफोर्निया स्क्रब जेच्या जोड्या मग हजेरी लावतात. अतिशय धीट आणि सुंदर भराऱ्या मारणारे हे पक्षी आपले वर्चस्व दाखवण्यात खूप वाकबगार असतात. त्यांचा चिवचिवाट काहीसा जोरदार असला तरी त्यांची गाणी मधूर असतात. बशीतल्या बिया एकानंतर एक, जितक्या उचलता येतील तितक्या उचलून चोचीत धरून नेण्याची त्यांची धडपड असते.

त्यानंतर येणाऱ्या चपळ खारुताईंचा नखरा फार चित्तवेधक असतो. करड्या आणि पिवळसर तपकिरी अशा दोन प्रकारच्या खारी आणि त्यांची पोरे आली की असतील नसतील तेवढ्या बिया, दाणे पुढच्या दोन पायात पकडून, ऐटीत बसून संपवू लागतात. खाण्याचा सपाटाच लावलेला असतो त्यांनी. मधेमधे थांबून फुलझाडांच्या कुंडीखालच्या बशीतले पाणीही पिऊन घेतात.








हा दिनक्रम चालू असताना मधून उडत येतो इवलुसा हमिंगबर्ड, हवेतल्या हवेत आपल्या पंखांची जलद हलचाल करून गुंजारव निर्माण करणारा. आपली लांब नळीसारखी चोच फुलांमध्ये बुडवून त्यातला मध पिणे हा त्याचा आवडीचा खेळ. त्याचे गडद गुलाबी डोके, चकाकणारा हिरवा रंग लक्षात यायच्या आधीच तो गायब झालेला असतो दुसरी फुले शोधण्यासाठी.

हळूच कधीतरी चाहूल घेऊन आवडीने बिया खाण्यासाठी येणारा सुंदर पक्षी म्हणजे पांढऱ्या छातीचा नटह्याच. त्याचे डोके त्याच्या अत्यंत छोट्या शेपटीमुळे मोठे दिसते आणि चोच लांब व निमुळती असते. त्याच्या डोक्यावरची पिसे काळपट असल्यामुळे टोपी घातल्यासारखी दिसतात. आकाराने टिटमाउस पक्षांपेक्षा थोडे मोठे असलेले हे पक्षी मोठ्या आवाजात साद घालतात. हिवाळ्यासाठी बियांचा साठा करून ठेवण्यासाठी ते परत परत बर्ड फिडर कडे येत रहातात.



या अशा छोट्या मित्रांशिवाय आकाशात घिरट्या घालणाऱ्या घारी, शिकारीकडे लक्ष ठेऊन झेप घेणारे ससाणे, जोरात आवाज करत बरोबर चिन्हाच्या आकारात उडत जाणारी कॅनडा गीझची माळही ही खिडकी मला दाखवते. अगदी परवाच एक तांबूस-तपकिरी रंगाचा ससाणा गच्चीत रेलिंगवर बसलेला आढळला. बराच वेळ तो तिथे होता. बर्ड फीडरला भेट देणाऱ्या खारींकडे त्याचे लक्ष असावे. कधी समोरच्या टेकडीवरच्या गवतात चरण्यासाठी येणारी हरिणांची जोडी किंवा आईबरोबर आलेली तिची पाडसेही हुंदडताना दिसतात. बऱ्याचदा क्लक क्लक आवाज करणाऱ्या टर्की पक्षांचा मोठा मेळावा तर कधी एखाद दोन टर्कीच गवतात खाणे टिपताना दिसतात.



नभाच्या नानारंगी छटा, दूरवर दिसणारी छोट्या टेकडीवरली घरे, आणि जुन्या उंच सदाहरित ओक आणि इटालियन सायप्रस वृक्षांच्या टोकांच्या पालवीच्या पार्श्वभूमीवर दिसणारा हा सुंदर देखावा खिडकीतून न्याहाळताना ती खिडकी नकळत मला अनेक गोष्टी शिकवते. माझं कुतूहल ती जागे करते, निसर्गात

राहणाऱ्या अनेक निष्पाप जीवांच्या दैनंदिन जीवनाची माहिती करून देते. रवींद्रनाथ टागोरांच्या निसर्गातल्या शांतिनिकेतन शाळेची आठवण करून देते. निसर्गाकडून मिळणारे अमूल्य शिक्षण हे त्याच्या सानिध्यात राहून, निरीक्षण करून, त्याला अनुभवत कसे मिळते ह्या टागोरांच्या स्वानुभवी सत्याचा ही खिडकी हा एक मोठा पुरावा आहे. शाळांमधल्या चार भिंतींच्या आत बांधलेल्या वर्गांच्या मर्यादित मार्गाशिवाय निसर्गाने या खिडकीद्वारे ओतलेल्या सजीव शिक्षणाची शाळा मी अगदी मनापासून पसंत करते आणि आवडीने त्याची विद्यार्थिनी बनते.

मी स्वतः निसर्गप्रेमी असले तरी वाइल्ड लाईफ फोटोग्राफीचे कौशल्य माझ्याकडे सध्यातरी नाही. या खिडकीतल्या शिक्षणाचे खूप सारे फोटो मी काढत असते पण माझा कॅमेरा म्हणजे माझा फोन, जो तेवढा शक्तिशाली नसल्यामुळे पक्षांची चित्रे ठळक दिसू शकत नाहीत. त्यामुळे प्रत्येक वर्णन केलेला पक्षी नीट समजावा म्हणून इंटरनेटवर उपलब्ध असलेले वाइल्ड लाईफ फोटोग्राफेर्सनी घेतलेले पक्षांचे फोटो मी या लेखासाठी वापरले आहेत आणि त्यांना मी मनापासून धन्यवाद देऊन त्याचे संपूर्ण क्रेडिट देते. खिडकीतून दिसणाऱ्या खारीचा फोटो तेवढा मी घेतलेला आहे.




- **स्मिता कुलकर्णी**




*********************************************************************************

CHICAGO'S
PIZZA
With-A-Twist

**कविता: बहावा**

नुकतीच अमिता Cancun, मेक्सिकोला गेली होती. तिथे फिरत असताना अचानक तिला बहाव्याचे फुललेले झाड दिसले आणि ती आश्चर्यचकित होऊन आनंदली. खूप वर्षांनी अचानक शाळेतली मैत्रीण भेटावी तसाच आनंद झाला तिला. त्यातूनच उमलली ही कविता.



***सूर्यकिरणांनी घेतला थोडासा विसावा***
***झगमगुन फुलला सोनसळी बहावा***

***आठवणींच्या कुपीत जपलेला***
***अचानक उभा ठाके बहरलेला***

***हा न माझा देश, ना माती जीवाची***
***तरीही मिठी दिठीची, अंतरंगाची नाती***

***सखीच्या मनीचा आला घेऊन सांगावा***
***स्मृतीगंधाने दरवळला अनिवार बहावा***

***पाकळी पाकळी फुललेली,हिरव्या पानात रमलेली***
***घोसा घोसातून ओथंबे, सळसळते झळाळी***

***रणरणत्या दुपारी कारंजी शिडकावा***
***उत्सव पिवळा, हळदी ओलावा***

***उन्मनित मन, उल्हसित तन***
***बहकलेला बहावा***



**-अमिता खरे**


FARMERS
INSURANCE
AMITA NATU
6049 Douglas Blvd, Granite Bay, CA, 95746.
Office : (916-993-5934) Cell: (408-203-24130)
anatu@farmersagent.com
CA License 0I33000
I can help you get the right Insurance Coverages for your specific needs.
Protect your family with the right amount of coverage.
HOME, AUTO, UMBRELLA, ANNUITIES, LIFE, MOTORCYCLE, BUSSINESS
WORKERS COMP, SPECIALITY INSURANCE.

*************************************************************************


This Diwali, send mithai gifts to your parents, friends & relatives in India.
Order mithai online & get it home delivered
www.mithai4all.com
We also deliver to US, UK, Canada, Singapore, Australia and 10+ countries
Celebrate Diwali with Mithai4all

## स्कॉटलंड- निसर्ग, राणी आणि जीवनपाणी ..

अलीकडे फेब्रुवारी महिना लागला की मित्रमंडळींमधे चर्चा सुरु होते. "काय गं, या वर्षी करताय काही प्लॅन समर चा की इथेच गेल्यावर्षीसारखे?", "You must go to Europe हं. We are तर planning just Rome this time ", "ए, सगळीच काय उठता आणि युरोप ला सुटता गं? आम्ही तर या वर्षी इंडोनेशियाला व्हिजिट करतोय भारतात जाता जाता. It will be so much fun ना !" आणि यांच्या अशा फन च्या गोष्टी ऐकता ऐकता मला टेन्शन यायला लागते.

Vacations हा अलीकडे विरंगुळ्याचा नव्हे तर "Status" चा मुद्दा झालेला आहे. खरं तर जरा २ आठवडे सुट्टी मिळण्याची शक्यता निर्माण झाली की माझे मन ओढ घ्यायला लागते देशाकडे. गेली अनेक वर्षं मी सुट्टी यासाठीच जमवायचे जेणेकरून दोन वर्षातून एकदा का होईना एक भारतवारी होईल. अर्थात भारतात फिरणे व्हायचे, पण माझा कल मुख्यत्वे लोकांना भेटणे याकडेच जास्त, त्यामुळे विरंगुळ्याचे पर्यटन by chance जमले तर, असे काहीसे. अर्थात फिरण्याची प्रचंड आवड लहानपणापासूनच. म्हणजे मी "Dream Job" असा जेंव्हा विचार करायचे तेंव्हा म्हणायचे "Travelling Job" हवा. म्हणजे कामाचे काम आणि फिरणे सुद्धा होईल. हे गणित माझ्या बाबतीत तरी अजून जुळून आलं नाही. अर्थात या वर्षी आम्ही "Vacation" या शर्यतीत आमचे नाव नोंदवण्यात सफल झालो, हे मात्र खरे !!

नवऱ्याचा मित्र गेले वर्षभर लंडन ला कामासाठी शिफ्ट झालेला आणि त्याचा खूप आग्रह चालला होता की आम्ही US ला परत यायच्या आधी मारा चक्कर. म्हणून डिटेल प्लॅन जरी केला नव्हता तरी विमानाचे बुकिंग करून ठेवले होते. अशा प्रकारे या वर्षीच्या समर व्हेकेशनवर ठसठशीत शिक्कामोर्तब झाले होते. लंडन मध्ये ३-४ दिवस राहून मग पुढे ग्रीस ला जावे की पॅरिस करावे अशी चर्चा चालू असताना स्कॉटलंड चे नाव डोळ्यापुढे आले आणि आम्ही दोघांनी ते ठरवूनही टाकले. स्कॉटलंड चे ठरल्यावर मला अचानक माझ्या कॉलेज च्या दिवसातला एक किस्सा आठवला आणि आता या क्षणी सुद्धा मला त्या आठवणीने हसू आले.

कॉलेज मधे असताना आम्हाला एक डॉक्युमेंटरी दाखवली होती UK संदर्भात आणि त्यात स्कॉटलंड चा युनीक असा राष्ट्रीय पोशाख पाहून आम्ही मैत्रिणी अक्षरशः "फिदीफिदी" हसलो होतो. म्हणजे जगभरातील पुरुषांच्या पारंपरिक पोशाखात शक्यतो सदरा आणि विजार यांचा समावेश असतो. त्यात लांब, ढगळा,घट्ट, असे प्रकार असतात, पण मूळ असतो सदरा आणि विजार! या उलट त्या डॉक्युमेंटरीमध्ये स्कॉटिश पुरुषांचा जो पारंपरिक पोशाख बघितला त्यात त्यांनी चक्क स्कर्ट्स घातलेले होते बायकां-मुलीं सारखे! त्यामुळे जगाच्या पाठीवर हा एकमेव प्रदेश आहे जिथे पुरुष बायकांसारखे स्कर्ट्स घालतात, ते सुद्धा असे चट्टेरी-पट्टेरी या विचाराने आमची चांगलीच करमणूक केली होती. अर्थात कालांतराने थोडा रिसर्च केल्यावर समजले होते की स्कॉटलंड च्या पुरुषांच्या या पारंपरिक राष्ट्रीय पोशाखा ला स्कर्ट न म्हणता Kilt (किल्ट) असे म्हणतात आणि वेगवेगळ्या समूहांच्या/वंशांच्या (Clans) कमी-जास्त सामाजिक प्रतिष्ठेप्रमाणे किल्ट बनवण्याच्या कापडाचा दर्जा कमी-जास्त असतो आणि त्यावरून ज्येष्ठ-कनिष्ठ असा फरक ओळखला जातो. १६ व्या शतकात स्कॉटलंड मध्ये प्रस्थापित झालेल्या या पुरुषांच्या पारंपरिक पेहेरावाला आयरिश संस्कृतीने सुद्धा २० व्या शतकापासून आपलंसं केलं आणि आजच्या घडीलाही तिथल्या पुरुषांचा पारंपरिक पोशाख असा जगावेगळाच आहे.

अशा या लंडन-स्कॉटलंडचा ठरवलेला दौरा आम्ही या समर मध्ये पूर्ण केला. लंडनच्या रस्त्यांवरून त्या दमट हवेत फिरताना मी मुंबई च्या आठवणीने प्रचंड कासाविस झाले. तशीच लागून लागून दुकाने, लाल डबल-डेकर्स, डाव्या बाजूचे वाहनांचे चलन, फुटपाथवर भरभर चालणारी माणसे, लोकांनी तुडुंब भरलेल्या अंडरग्राउंड ट्यूब्ज (local

trains) वगैरे वगैरे. ३-४ दिवस लंडन भटकण्यात घातल्यावर मात्र माझे मन पर्यटनाचा वेगळा अनुभव घेण्याच्या ओढीने कधीच स्कॉटलंडच्या दिशेने झेपावायला लागले होते.




आजकाल तंत्रज्ञान, इंटरनेट यामुळे जगभरातल्या गोष्टी एका क्लिक मध्ये बसल्या जागी कळतात, त्यामुळे जिकडे पर्यटनाला जायचे आहे तिथली बरीचशी माहिती आपल्याला आधीच मिळवता येते. पण तरीही स्वानुभव आणि " आँखो देखा हाल" याची मजा काही औरच असते याचा या प्रवासात पुनःप्रत्यय आला.

रेल्वेच्या प्रवासाने लंडन पासून स्कॉटलंड मधले एडिनबरा (Edinburgh) हे ठिकाण साडेचार तासांच्या अंतरावर आहे. आणि इथेच आमचे राहण्याचे बुकिंग झालेले
होते. आधी काढलेल्या माहितीनुसार एडिनबरा, इन्व्हरनेस (Inverness), ग्लॅसगो (Glasgow) आणि स्टर्लिंग (Stirling) ही स्कॉटलंड मधली पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाची ठिकाणे. एडिनबरा मध्ये राहून बाकीची ठिकाणे Day Trips करून बघता येतील अशी शक्यता असल्यामुळे आम्ही तिथेच मुक्काम करण्याचे ठरवले होते. लंडन ते एडिनबरा या रेल्वेच्या प्रवासात पण जाताना बघायला मिळणाऱ्या ब्रिटिश Country-Side साठी खूप उत्सुकता होतीच आणि त्यासाठीच मी माझा iPhone चा कॅमेरा पण सज्ज करून ठेवला होता. विशेष म्हणजे या प्रवासा दरम्यान ब्रिटिश Country-Side ची जी झलक पहायला मिळाली त्याची छाप कायमची मनावर पडली हे मात्र नक्की.

एडिनबराच्या स्टेशनला उतरल्यावर आम्ही बाहेर आलो. लख्ख सूर्यप्रकाश पडलेला आणि त्यात चमकणारा दिमाखदार एडिनबरा चा कॅसल त्या स्टेशनच्या बाहेर, हाकेच्या अंतरावर! मी तर भान हरवून बघतच बसले. सभोवार नजर फिरवली तेंव्हा आपण इसवीसन पूर्व काळात प्रवेश केलाय की काय अशी शंका मनात डोकावून गेली आणि मी शेजारी उभ्या नवऱ्याच्या हाताला हळूच चिमटा काढला. काहीच न कळून कळवळून त्याने माझ्याकडे पहिले तेंव्हा

समजले की हो, खरंच आहे हे - स्वप्न नाही, आणि माझ्या त्या भारावलेल्या अवस्थेचा फायदा घेत नवऱ्याने अचानक प्रश्न टाकला. "प्रीती, GPS ना स्टेशन पासून हॉटेल चे अंतर फक्त १.२ माईल दाखवतोय. छान ऊन पडलंय, तर चालत जाऊयात का?" मी पण विचार केला की सामान फार नाहीये, असेही ट्रेन मध्ये बसून अंग पण आखडलेय आणि अशा ऐतिहासिक शहराचा आनंद घेत चालत जायला मजा येईल, म्हणून मी पण मग हो म्हणाले आणि आम्ही GPS दाखवेल त्या रस्त्याने चालायला सुरुवात केली. डावीकडे ब्रिज संपल्यावर जेफरी रस्त्यावर उजवीकडे वळायचे आणि सरळ जायचे. जेफरी चा चौक येताच उजवीकडे नजर वळवली तर हाsss सरळ चढणीचा रस्ता. मी एक नजर नवऱ्याकडे आणि एक चढत जाणाऱ्या रस्त्याकडे टाकली आणि दीर्घ श्वास घेऊन पुढे चालू लागले. खरं तर त्या क्षणाला नवऱ्याने "उबर/टॅक्सी करूयात का?" असा प्रेमळ पर्याय दिला होता, पण त्या चढत जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वसलेल्या त्या प्राचीन आर्किटेक्चर असलेल्या इमारतींनी मनाला एव्हाना भुरळ घातली होती त्यामुळे मी टॅक्सी च्या प्रलोभनाकडे कानाडोळा केला. तशी बरीच माणसे त्या चढणीवरून जा-ये करत होती. त्यात स्थानिक लोकांबरोबरच अनेक पर्यटकही दिसत होते त्यामुळे जमेल की आपल्यालापण या विश्वासाने पुढे पाऊल टाकले. थोडक्यात सांगायचे तर, तो चढणीचा किल्ला आम्ही सर केला, पण ते करताना बरेच हाल झाले. हा जेफरी रस्ता छान गुळगुळीत डांबरी रस्ता नसून छोट्या-मोठ्या दगडांचा बनवलेला जुन्या काळातला रस्ता होता. त्यामुळे आमच्या रोलर बॅग्ज त्यावरून ओढत नेण्याचा प्रचंड खटाटोप आम्हाला करावा लागला, तसेच GPS चा दिशादर्शक हा "चालणे" या सेटिंग वर असल्याने त्याने आम्हाला अनेक आतल्या आतल्या शॉर्ट कट्स वरून नेले पण ते पायऱ्या पायऱ्यांचे असल्याने बॅग्ज उचलून जाता-जाता आमची काय अवस्था झाली असेल याची तुम्ही कल्पना करू शकता. दुःखात सुख एवढेच की मधेच एका "Fig Tree" नावाच्या मेडिटेरेनियन रेस्टॉरंट मध्ये "लेंटिल सूप" नावाचे इंधन आम्ही पोटात भरून घेतले असल्याने पुढची हॉटेल पर्यंतची वाटचाल खडतर असूनही पूर्ण करू शकलो. फिरायलाच आलेलो असल्याने तसा उत्साह खूप होता आणि वेळेचंही बंधन नसल्याने हा प्रयोग शक्य झाला, पण त्या दिवसानंतर एडिनबरामध्ये चालणे हे आम्हाला "ह्यॅ, हे तर काहीच नाही" अशीच अनुभूती देत राहिले आणि त्यामुळे आम्ही पुढचे चारही दिवस पायी भटकंती खूप केली.

जून, जुलै आणि ऑगस्ट हे तीन महिने इथे उन्हाळ्याचे समजले जातात. या समजाला म्हणावा तसा अर्थ नाही हे तिथे गे ल्यावर लक्षात येते. पाऊस हा तिथे रोजच पडतो. आपल्या श्रावणासारखा ऊन-सावलीचा खेळ खेळतो. फक्त उन्हाळ्याच्या समजल्या जाणाऱ्या या तीन महिन्यात साधारण १५-२० दिवस असेअसतात की जेंव्हा छान सूर्य चमकत असतो आणि तापमान १७ ते २० डिग्रि सेल्सियस असे असते. आम्ही तिथे पोहोचलो तो एक दिवस सोडला तर म्हणावं तसं सूर्यदर्शन आम्हाला पुढच्या वास्तव्यात झालंच नाही. अर्थात सतत बदलणाऱ्या हवामानाचे, रोज पडणाऱ्या पावसाचे प्रकार इथल्या स्थानिक लोकांच्याचांगल्याच सवयी चे झालेले असल्याने त्यांची दैनंदिनी ठरल्याप्रमाणे न चुकता चालू असते. म्हणजे पडणाऱ्या पावसाला सांभाळत आम्ही आमच्या टूर बसकडे कसाबसा मार्ग काढत असताना सकाळी ७ ला अनेक बायका, पुरुष, मुलं-मुली जॉगिंग ला बाहेर पडलेले दिसले. आता हा स्का ॅटलंड च्या "Water of Life" (व्हिस्की) चा परिणाम की अजून काही - कोणास ठाऊक... परंतु इथले दैनंदिन जीवन तसे कष्टाचे आहे आणि त्यामुळेच कदाचित इथली माणसे खूप काटक आहेत. म्हणजे दोन्ही हातात पुस्तकांनी भरलेल्या पिशव्या सांभाळत, पडणाऱ्या पावसाला न जुमानता त्यातून झपाझप चालणाऱ्या ७० वर्षांच्या आज्जी मी पाहील्या तसेच बॅकपॅक घेऊन रनिंग करणारे ८० च्या आत-बाहेरचे आजोबा पण बघितले. मुलांना शाळेतून चालत-चालत घेऊन येणाऱ्या आया (मॉम्स)सुद्धा पाहील्या आणि चालतच पिझ्झा डिलिव्हरी करायला जाणारा बॉय पण बघितला. या स्कॉटिश लोकांच्या निरोगी आयुष्याचं सार त्यांच्या या चालण्यातच असेल का, असाही प्रश्न माझ्या मनाला पडून गेला!

निर्मात्याने भरभरून दिलेलं निसर्गसौन्दर्य आणि आपल्याला मिळणारं नेत्रसुख हे न चुकणारं समीकरण मात्रं इथे पदोपदी जाणवतं - विशेषतः Highlands मध्ये. स्कॉटलंड Highlands ही समुद्र सपाटीपासून ३००० ते ४००० फूट उंच असलेली विस्तीर्ण पर्वतरांग आहे आणि याचे वैशिष्ठ्य म्हणजे केवळ या पर्वतरांगांच्या कुशीत १०००० हुन जास्त लहान-मोठे फ्रेश वॉटर तलाव आहेत. पूर्ण स्कॉटलंड मध्ये ३०००० च्या वर तलाव आहेत. हिवाळ्यात बर्फामुळे या पर्वतरांगा प्रवेशयोग्य राहत नाहीत, पण उन्हाळ्याच्या तीन महिन्यात जर आपण तिथे असलो तर हिरवीगार पठारं, डोंगरमाथ्यावरून खाली झेपावणारे असंख्य छोटे-मोठे धबधबे, तुडुंब पाण्याने भरलेले तलाव-नद्या आणि त्याच्या काठाने गवत तृणांबरोबर फुललेली विविध प्रकारची, रंगांची फुले हे भूदृष्य सभोवार नजरेस पडतं आणि मन तृप्त होतं. स्कॉटलंड मधला एक दिवस आम्ही असा Highlands फिरण्यातच घालवला आणि हे फिरताना शरीर जरी थकले तरी निसर्गाचे जे रूप दृष्टीस पडले ते मनाला शब्दात सांगता न येण्यासारखी ऊर्जा देऊन गेले.



एका महत्वाच्या उल्लेखामुळे आणि व्यक्तीमुळे स्कॉटलंड हे नेहमी विशेष प्रकाशझोतात असते, आणि ते म्हणजे Queen Elizabeth II of the United Kingdom of Great Britain and Northern Ireland, जिची कर्मभूमी ही जरी लंडन मधील बकिंगहॅम पॅलेस असली तरी तिचे बहुतांशी वास्तव्य हे एडिनबरा मधील तिच्या आवडत्या राजवाड्यात असते. राणीचे स्कॉटलंड वरील विशेष प्रेम आणि मेहेर नजर यामुळे येथील जनतेची पण ती अतिशय आवडती राणी आहे. राणीच्या विशेष मर्जीमुळे नव्या पिढीला बरेचसे तंत्रज्ञान संदर्भातले लंडन मधले काम

इथे स्कॉटलंड मध्ये उपलब्ध होऊन त्यांना रोजगार मिळत आहे.पारंपरिकरित्या शेती हाच एक व्यवसाय असलेल्या स्कॉटलंड मधली तरुण पिढी पूर्वी शिक्षण झाले कि नोकरीसाठी बाहेर पडत असत, परंतु आता हळू हळू ते चित्र बदलते आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमीवर बघितले तर स्कॉटलंड च्या विस्तीर्ण माळरानांनी आणि उंचावर बांधलेल्या किल्ल्याच्या बुलंद तटांनी रोमनसाम्राज्याला परतवून लावण्यात नेहमीच यश मिळवले आणि त्यामुळेच रोमन फौजा पूर्ण स्कॉटलंड वर कधीच सत्ता गाजवू शकल्या नव्हत्या आणि अनेक लढायांमध्ये शेवटी शरणागती पत्करून त्याना परतीचा मार्गच ध रावा लागला होता. ज्या लोकांना जुने किल्ले, राजवाडे, त्यांची बांधणी, आर्किटेक्चर त्यांचा इतिहास या सगळ्यात खूप रस आहे त्यांच्यासाठी स्कॉटलंड ही इतर युरोपीयन स्थळांप्रमाणेच एक पर्वणी आहे.



हॅगस (Haggis) हा स्कॉटलंड चा कुठल्याही खाद्यपदार्थाची दुकाने किंवा रेस्टॉरंट्स या ठिकाणी हमखास मिळणारा राष्ट्रीय पदार्थ. पण मी या राष्ट्रीय खाद्यपदार्थाची जेंव्हा तपशीलवार माहिती काढली तेंव्हा "हाडाची शाकाहारी" या नात्याने केवळ उलटी करायचीच बाकी होते. हॅगस हे मेंढ्यांचे यकृत, हृदय आणि फुफ्फुसं यांच्या मिश्रणातून बनवललेले नमकीन (savory) पुडिंग, शॉर्टब्रेड व पोरीज (ज चा उच्चार जिंकण्यातला, ज जहाजातला नव्हे) हे काही पारंपरिक समजले जाणारे स्कॉटिश पदार्थ. तिथल्या एका मेनूकार्ड वर मी पुढील ओळी वाचल्या ज्या मला खूप प्रामाणिक वाटल्या. *"The food of our native Scotland may not exactly have a reputation for being 'fine dining' or 'popular cuisine' but..you will be surprised to see how diverse and tasty it is!"*



इथे रेस्टॉरंट्स मध्ये बाकी सगळे आलबेल असते.
म्हणजे कोणाला कशाचीच घाई नसते. आरामात मेनूकार्ड येते, आरामात ऑर्डर घेतली जाते आणि अतिशय आरामात खाणे येते. या पर्यटन स्थळाच्या शिक्क्यामुळे बरीच आंतरदेशीय cuisines आता इकडे दिसतात.
त्यात भारतीय, नेपाळी, पाकिस्तानी,थाई,इटालियन, बांग्लादेशी यांचा प्रामुख्ख्याने समावेश
आहे, पण त्यातही एक गम्मत अशी आहे की यांचा " Take Out" आणि Home
Delivery यावर प्रामुख्याने भर असतो. छान जाऊन बसावे असा ambiance केवळ पब्ज मध्ये असतो. अर्थात कारण समजण्यासारखे आहे. पाऊस आणि थंडीच्या वातावरणात कुठे बाहेर जाण्यापेक्षा घरपोच गरम गरम फूड मिळाले तर कोणाला नको असते?

स्कॉटलंडचं अजून एक त्याच्या नावात दडलेलं आकर्षण म्हणजे इथली जगप्रसिद्ध स्कॉच व्हिस्की, ज्याला स्थानिक लोकं मी मगाशी उल्लेख केल्याप्रमाणे " Water of Life
सं म्हणतात. स्कॉटलंड मध्ये जेवढी जमीन आहे त्याच्या १५% जमीनीवर जंगल आहे, ५% जमीन हे केवळ गुरांना चरण्यासाठीची मोकळीगवतांची कुरणे आहेत आणि उरलेल्या ८०% जमीनीत शेती होते त्यात व्हिस्कीच्या वाढत्या माग णीमुळे बहुतांशी पीक बार्लेचे. नंतर गहू, बटाटे आणि काही फळे. तर या बार्लेच्या पिकाला आणि पर्यायाने व्हिस्की बन वण्याच्या प्रक्रियेला प्रचंड फ्रेश वॉटर चा पुरवठा लागतो. शिवाय या स्कॉच व्हिस्की च्या निर्यातीचा स्कॉटलंड च्या अर्थ

व्यवस्थेत फार मोलाचा वाटा आहे. त्यामुळे फ्रेश वॉटर हे इथले खऱ्या अर्थाने "जीवन" आहे आणि ह्या "जीवनाचा" खरा स्रोत "पाऊस", म्हणूनच बहुदा या लोकांनी पावसाला एवढं आपलंसं करून घेतलेलं आहे. पाऊस म्हणजे इथलं समृद्ध आयुष्य बघून देवदूताने ढाळलेले आनंदाश्रू असा स्थानिक लोकांचा समज असल्याचे पण मला काही लोकांशी गप्पा मारल्यावर समजले. सिंगल माल्ट व्हिस्की ही स्कॉटलंड च्या ५ वेगवेगळ्या भागात बनवली जाते आणि त्या त्या भागाप्रमाणे तिथे तयार होणाऱ्या व्हिस्की च्या चवीत आपापले असे वैशिष्ठ्य असते. बार्ले, पाणी आणि यीस्ट या तीन गोष्टींपासून बनणारी व्हिस्की तयार होण्यासाठी जी प्रक्रिया आहे ती मात्र खूप कसोशीने आणि लक्षपूर्वक त्या क्षेत्रातील ज्ञान असलेल्या लोकांनीच करावी लागते. आम्ही सुद्धा Highlands च्या अशा दोन वेगवेगळ्या डिस्टीलरीज ना भेटी दिल्या आणि व्हिस्की टेस्टिंग चा आनंद घेतला. एक गोष्ट मला इथे प्रामुख्याने सांगावी वाटते की जगाला सिंगल माल्ट पुरवणाऱ्या स्कॉटलंड मधील लोकांमध्ये मात्र बीअर आणि कोकचे सेवन सर्वात जास्त आहे. इथे तयार होणारी व्हिस्की एवढी महाग असते की स्थानिक लोकांच्या खिशाला ती परवडत नाही म्हणे. अशा वेळी "पिकते तिथे विकत नाही" सारख्या म्हणीचा अचानक प्रत्यय येतो !

स्कॉटलंड ची सध्याची लोकसंख्या साधारण ५ मिलियन आहे (मेंढ्या मात्र ११ मिलियन आहेत) आणि शेतीबरोबरच "पर्यटन" हा अलीकडे तेजीत चाललेला व्यवसाय आहे. तिथल्या टुरिस्ट कंपनीज च्या अनुभवाप्रमाणे गेल्या ५ वर्षात "भारतातून आलेल्या भारतीय" पर्यटकांची संख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे भारतीय पर्यटकांविषयी इथे फार प्रेमाने/ आपुलकीने बोलले जाते. स्कॉटलंड च्या अर्थव्यवस्थेला हातभार लावणाऱ्या आणि पर्यायाने आम्हा इतर भारतीयांना त्यांचे विशेष प्रेम मिळवून देणाऱ्या आपल्या भारतीय पर्यटक बंधुभगिनींचे मनापासून आभार!!

संपली सुट्टी, उद्या आता निघायचे परत असा विचार करत मी आणि माझा नवरा आमच्या हॉटेल जवळच्याच एका पब मध्ये "श्रमपरिहार" करण्यासाठी बसलो होतो. संध्याकाळची वेळ, भरून आलेले आभाळ आणि भुरभुरणारा पाऊस. हळू हळू पब मध्ये येणाऱ्या लोकांची गर्दी वाढत होती. बरेचसे स्थानिक क्राउड होते. त्यांचे बोलणे बहुतांशी इंग्रजीत असले तरी बोलण्यातली स्कॉटिश ढब कळत होती. आणि अचानक "How are you beautiful people?" असे विचारात एक साधारण पंचाहत्तरीच्या बाई आमच्या टेबलाकडे आल्या. आम्ही जरा गोंधळलोच. मग त्यांनी स्वतःची " ग्लोरिया" अशी ओळख करून देत पुढची १५-२० मिनिटं आमच्याशी गप्पा मारल्या. आम्ही कोण-कुठचे वगैरे चौकशी केली. आणि जाता जाता माझ्या गालावर किस करत आणि माझ्या नवऱ्याशी शेकहॅण्ड करत खूप सारे आशीर्वाद देत निघून गेल्या. आमच्या चेहऱ्यावरचे बावरलेले भाव टिपून मग आमच्या सर्व्हर ने आम्हाला ग्लोरिया आज्जीची गोष्ट सांगितली. ५ वर्षांपूर्वी नवरा गेल्यावर आणि स्वतः प्राध्यापिकेच्या कामातून निवृत्त झाल्यापासून त्या आजी आठवड्यातून तीन वेळा या पब ला येतात, आपली वाईन ऑर्डर करून स्थानिक लोकांशी गप्पा मारतात आणि कोणी पर्यटक दिसला तर त्याच्याशी आवर्जून जाऊन ओळख करून घेतात. आता वयाच्या या टप्प्यावर स्वतः आनंदी राहणे व इतरांना तो मुक्तपणे वाटणे हे काम त्या चोखपणे बजावतात.

एडिनबरा मधल्या वास्तव्याचे चार दिवस भुर्रकन उडून गेले आणि लक्षात आले की आम्ही स्कॉटलंड ची ट्रिप ठरवताना तयार केलेल्या यादीमधील काही गोष्टी नाहीच बघू शकलो. अर्थात याचा म्हणावा तेवढा खेद नाही झाला कारण त्यातच स्कॉटलंड ट्रिप # २ च्या कल्पनेचा पाया पक्का झाला. असेही हे ठिकाण परतपरत भेट द्यावे असेच आहे. निसर्ग, इतिहास आणि व्हिस्की यातील काहीही जर तुमच्या मनाला साद घालत असेल तर पुढच्या ट्रिपला आमच्याबरोबर नक्की चला. More the Merrier…

आता लंडनच्या परतीच्या प्रवासात त्या ग्लोरिया आज्जीची मनातली ताजी ताजी ठवण, त्यांचे contagious निर्मळ हसू, त्यांनी भरभरून दिलेले आशीर्वाद, आमचे त्या चार दिवसातले बाकीचे अनुभव हे राहून राहून माझ्या डोळ्यासमोर येत होते, आणि गालात हसताना एका वेगळ्याच समाधानात मी समोरच्या डायरीत लिहीत होते –

स्कॉटलन्डचा पाऊस
फिरणे अन् भिजण्याची हौस
दर मैलाला नवा नजारा
ऊन किंवा ओथंबल्या ढगांचा पसारा !

हिरवी हिरवी मखमल माया
पसरलेली आडवी-तिडवी
लोकांच्या ओठांवरही
स्मितरेषा पुसट हिरवी !

मधेच किरणांसवे
उजळणारे निळे आकाश
अन् घेरून आलेल्या थंडीला
नव्या ऊबेची आस !

निसर्गाचा खेळ इथला
थोडा थोडा रिस्की
नेव्हर माइंड म्हणत
हातात घ्यायची व्हिस्की !




**-प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com, preeti.deshpande5@gmail.com**

## चित्रकथी: फायरफॉल

दरवर्षी फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात हा अविस्मरणिय फायरफॉल (Fire-fall) पाहण्यासाठी हजारो लोक योसेमीटी(Yosemite)नॅशनल पार्क मध्ये कुडकुडत्या थंडी-पावसात गर्दी करतात. हे फेब्रुवारी महिन्यातच घडतं कारण सूर्यकिरण ठराविक अँगलने धबधब्यावर पडतात. फायरफॉल दिसण्यासाठी अजुन इतर गोष्टींचं जुळून येणं सुध्दा गरजेचं आहे. एक म्हणजे Horsetail falls ला पाणी असायला हवं. त्यासाठी पुरेसा बर्फ पडलेला हवा आणि त्या दिवशी पुरेसं गरम वातावरण हवं कि जेणेकरून बर्फ वितळून पाणी धबधब्यात येईल. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे सूर्यास्ताच्यावेळी पश्चिमेकडचं आभाळ निरभ्र असावं नाहीतर सूर्य ढगांआड असल्यास फायरफॉल वर लाईट पडणार नाही आणि या सगळ्या गोष्टी जेव्हा जुळून येतात त्यावेळी सुमारे दहा मिनिटासाठी horsetail fall असा उजळून निघतो कि जणू वाटावं धबधब्यातून आगच वाहतीये. म्हणूनच त्याला "फायरफॉल" अस नाव पडलं. प्रत्यक्षात फायरफॉल बघणं हा अतिशय अविस्मरणीय अनुभव आहे.

मी जेव्हा फायरफॉल बद्दल पहिल्यांदा ऐकलं तेव्हापासून मला फायरफॉल पाहण्याची इच्छा होती. या वर्षी सुदैवाने योगायोग जुळून आले आणि आम्ही चार तास प्रवास करून बर्फ पडत असतानाच योसेमीटीला(Yosemite) पोहोचलो. त्यानंतर अंग गोठवून टाकणाऱ्या ठंडीत 30-40 मिनिटे चालत जिथून फायरफॉल दिसेल अशी जागा शोधून,कॅमेरा सेट करुन फायरफॉल सुरु होण्याची वाट पाहत थांबलो. दिवसभर पाऊस चालू असल्यामुळे आभाळ ढगाळलेलंच होत पण थोड्या वेळात आज काही फायरफॉल होत नाही असं वाटत असतानाच अचानक ढगांची जागा सूर्यकिरणांनी घेतली आणि ती किरणे धबधब्यावर पडून तो उजळून गेला. सगळ्यांना कायमचा आठवणीत राहील असा अभूतपुर्व अनुभव देऊन आणि तो अविस्मरणीय अनुभव कायमचा जपून ठेवण्याच्या प्रयत्नात मी काढलेले हे फोटो खास तुमच्यासाठी.



**-सुलभा हारदे**


Sulbha harde
photography


sulbha harde
photography

## पाककृती : सोयाबीन कोकोनट करी

तेल, जिरे, मोहरी, कढीपत्ता, हिंग याची फोडणी करा. त्यात सोयाबीन घालून सात मिनिटे परतून घ्या. त्यात चवीपुरते मीठ, गूळ (किंवा brown sugar), लाल तिखट, धणे-जिरे पावडर, हळद घालून पाच मिनिटे परतून घ्या. आता त्यात नारळाचे दूध (कोकोनट मिल्क ) घालून ढवळून घ्या. दहा मिनिटे शिजवून मग वरून कोथिंबीर टाकून सजवा. अतिशय स्वादिष्ट अशी सोयाबीन कोकोनट करी गरम गरम वाढा.






**-मनिषा होतपेटी**

## उर्वरित कार्यक्रम कॅलेंडर




INCHIN'S
BAMBOO GARDEN
pan asian cuisine

# Visit us at

## www.mmsac.org

Like us on Facebook

Contact us at

mmsac.committee@gmail.com